महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.**
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं/जनसंपर्क/प्रेस नोट/४४

# वृत्तपत्र निवेदन

## कारागीर (क) भरती प्रक्रियेत महानिर्मितीचे प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य
## उर्वरित प्रकल्पग्रस्तांची दुसरी निवड सूची लवकरच जाहीर होणार

महानिर्मितीने जाहिरात क्र. ०५/२००९ अन्वये कारागीर - क पदावर सुमारे १०७६ उमेदवारांची भरती करण्यासाठी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. प्रकल्पग्रस्तांना महानिर्मितीच्या सेवेत कारागीर-क पदावर सामावून घेण्यासाठी प्रकल्पग्रस्तांच्या संघटना स्थानिक प्रशासन व मुख्यालय येथे वारंवार निवेदने सादर करत आहेत. गेल्या महिन्यात पहिली निवडसूची जाहीर करण्यात आली.

महानिर्मितीने सुरु केलेल्या निवडप्रक्रियेत महानिर्मितीच्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य देण्याबाबतचा अंतिम निर्णय घेऊन **मार्चच्या पहिल्या आठवड्यात दुसरी व अंतिम सूची जाहीर करण्यात येईल, हे महानिर्मितीतर्फे स्पष्ट करण्यात येत आहे.** तसेच जे प्रकल्पग्रस्त उमेदवार सध्या ट्रेड टेस्ट उत्तीर्ण झाले नसतील, अशा प्रकल्पग्रस्त उमेदवारांनादेखील महानिर्मितीमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून विद्या वेतनावर निवडण्यात येऊन व एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर त्यांची पुन्हा ट्रेड टेस्ट घेण्याचा प्रस्ताव देखील विचाराधीन आहे.

मात्र वीजकेंद्र वा वीज प्रकल्पामधील हिंसक कारवाईमध्ये सहभाग आढळलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांना यापुढे सेवाभरतीसाठी पात्र धरले जाणार नाही, हे देखील महानिर्मितीतर्फे स्पष्ट करण्यात येत आहे.

---

दिनांक : २६/०२/२०१०.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**